Shri Sharada Bhavan Education Society's
**YESHWANT MAHAVIDYALAYA, NANDED-431602 M.S.)**
(Affiliated to Swami RamanandTeerthMarathwada University, Nanded)
**NAAC Reaccredited "A+" Grade (IV[th] Cycle)**
**'COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE STATUS'**

**UG**-Arts, Science,Commerce, B.Sc.(C.S.), B.Sc.(B.T.), **PG**-Economics, History, English, Sociology, M.Com., Chemistry, Zoology, Environmental Science, Microbiology, Computer Science, Dairy Science, MCM, Information Technology, Biotechnology, Electronics,Botany, PG Diploma in Tax Procedure & Practice, PG Diploma in Electronics/Embedded System Design, **Research Center**in Biotechnology, Botany & Horticulture, Chemistry, Commerce, Computer Science & Information Technology, Dairy Science, Economics, Electronics, English, Environmental Science, Hindi, History, Marathi, Mathematics & Statistics, Microbiology, Political Science, Physics, Urdu & Zoology)

**Establishment Year: 1963**

| Hon'bleShriAshokraoChavan | ShriD.P.Savant | Dr.GaneshchandraShinde |
|---|---|---|
| President | Secretary | Principal |

Phone No.s:- (02462) 254170, 254487(Office), 253726(Fax)
**website: www.ymnnanded.in Email: principalymn@gmail.com**

**Ref.No.: Exam/2024-2025/** **Date: 03/09/2024**

## पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अत्यंत महत्वाची व काल मर्यादेची सुचना
### (शै.वर्षे २०२४—२५ प्रवेशीत एम.ए., एम.कॉम. व एम.एस्सी. प्रथम वर्ष)

शैक्षणिक वर्षे २०२४—२५ मध्ये एम.ए., एम.कॉम. व एम.एस्सी. प्रथम वर्षासाठी **NEP-2020** अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, आपण ज्या वर्गासाठी प्रवेश घेतलेला आहे त्या वर्गाची पात्रता (**Eligibility**) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्याकडे विद्यार्थ्यांनी स्वत: ऑनलाईन करणे अनिवार्य आहे. त्याकरीता संबंधित विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे आपली (**Eligibility**) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या **https://srtmuadm.dulive.ac/applicant/#/login?client=SRTMU** या लिंकचा किंवा खालील **QR Code** चा वापर करून आपल्याशी संबंधित शैक्षणिक व वैयक्तिक माहिती भरावायाची आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्याशी संबंधित सर्व माहिती अचुक टाईप करावी. आपण सादर केलेलया माहितीच्या आधारे आपणास परिक्षा फॉर्म भरता येणार आहे व त्याप्रमाणेच परिक्षेचे प्रवेश पत्र (अॅडमीट कार्ड), गुणपत्रक (मार्क मेमो) व इतर सर्व प्रमाणपत्र प्राप्त होणार आहेत. त्यामुळे आपण आपली माहिती टाईप करतांना नावामध्ये व इतर कांही चुक झाल्यास स्वा.रा.ती.म.विद्यापीठाकडून आपला निकाल रोखला जावु शकतो त्यासाठी आपण स्वत: जबाबदार रहाल, महाविद्यालय जबाबदार राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

वरिल प्रमाणे ऑन लाईन पुर्ण माहिती भरून आपले विषय निश्चित झालयानंतरच **Submit** करणे त्यानंतर फॉर्ममध्ये कोणताही बदल करता येणार नाही. सर्व पुर्ण झालेला फॉर्म महाविद्यालयात खिडकी क्रमांक २ वर दिनांक २०.०९.२०२४ पर्यंत जमा करणे अनिवार्य आहे. वेळेच्या आत आपली पात्रता ऑनलाईन झाली नाही तर आपला प्रवेश रदुद होईल व त्यास आपण स्वत: जबाबदार रहाल याची गांर्भियाने दखल घ्यावी.

PRINCIPAL
Yeshwant Mahavidyalaya
NANDED

।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर,विष्णुपुरी,नांदेड –४३१६०६(महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 (Maharashtra)

Established on 17th September 1994,Recognized by UGC U/s 2(f)and 12(B),NAAC Re accredited with 'B++'Grade

## EXAMINATION DEPARTMENT (ELIGIBILITY SECTION)

Phone:(02462)215242,43,44 Website: eligibility@srtmun.ac.in

Ref.No. :Exam./Eligibility/2024-25/180 Date :- 04/09/2024

## परिपत्रक

### (NEP-2020 पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता)

**विषय: Online पात्रता आवेदन पत्र सादर कारणे बाबत**

वाचा :– १. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. शै. /पात्रता/पदवीप्रवेश/२००४–०५, दिनांक २८/०५/२००४.

२. विद्यापीठाचे परिपत्रक क्र.Acad/Eligi/Admn./Gen.Rules/२८०.२४९,दि. १५/०६/२०११.

या परिपत्रकाद्वारे सर्व संलग्नित पदवी व पदव्युत्तर महाविद्यालय, सर्व संकुले, उपकेंद्र लातूर, उपपरिसर,परभणी, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली आणि कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शै.वर्ष २०२४–२५ करिता पात्रता आवेदन पत्र **ऑनलाईन** सादर करणे, पात्रता शुल्काचा धनाकर्ष व पात्रतेच्या यादया व इतर कागदपत्रासह माहिती विद्यापीठात सादर करावयाचे वेळापत्रक खालील प्रमाणे राहील.

**पात्रता शुल्क तक्ता**

| अ.क्र. | विवरण | शुल्क ( रूपये ) |
|---|---|---|
| १ | मराठवाडयातील विद्यार्थ्यांकरीता | १२०/– |
| २ | मराठवाडा क्षेत्राबाहेरील, परंतू महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरीता | २३०/– |
| ३ | महाराष्ट्र राज्याबाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता | ५६०/– |
| ४ | पीएच.डी. विद्यार्थ्यांकरीता | ५६०/– |
| ५ | परदेशीय विद्यार्थ्यांकरीता | ७८०/– |

**पात्रता आवेदन पत्र दाखल करण्याचे वेळापत्रक**

| अ. क्र. | विवरण | पात्रता आवेदनपत्र ऑनलाईन सादर करण्याचा अंतिम दिनांक | पात्रता आवेदन पत्र शुल्काचा **RTGS/NEFT**करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पात्रता आवेदन पत्र सादर करणे | २३/०९/२०२४ | २६/०९/२०२४ |

पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी **ऑनलाईन** पात्रता अर्ज सादर करण्यासाठी **https://srtmuadm.dulive.ac/applicant/#/login?client=SRTMU** या लिंकचा वापर करावा.

**NEP-2020** अंतर्गत विद्यार्थी स्वत: वरील **Online Link** व्दारे पात्रता अर्ज व अनुषंगीक माहिती भरेल. त्यानंतर सदर माहिती महाविद्यालयाने तपासून पात्रता विभागास विहीत वेळेत **Online** सादर करावी.

सदरील **Online Link** ही विद्यार्थ्यांना अवगत करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत महाविद्यालयाची असेल याची नोंद घ्यावी.

**Online** माहिती सादर करण्यास तांत्रिक अडचन सोडविण्याकरिता **8380954785** या मोबईल क्रमांकावर संपर्क साधावा.

**RTGS/NEFT/ धनांकर्ष खालील दर्शविल्याप्रमाणे काढण्यात यावा.**

**Bank details for RTGS/NEFT :**

**Name of the A/c holder : Finance & Accounts Officer, S.R.T.M. University, Nanded.**

**Name of Bank : IDBI Bank, Nanded.**

**IFSC Code : IBKL0000500 A/c Number 500104000028422.**

**वरील प्रमाणे ऑनलाईन सादर केलेल्या पात्रता यादीची प्रिंट, RTGS/NEFT केलेली पावती जिल्हा निहाय केंद्रावर सादर करण्याचा दिनांक व ठिकाण खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | जिल्हा | महाविद्यालय क्रमांक | दिनांक | पात्रता यादी व पावती सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | सर्व महाविद्यालये | २८/०९/२०२४ | पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ |
| २ | लातूर | सर्व महाविद्यालये | २८/०९/२०२४ | उपपरिसर लातूर |
| ३ | परभणी | सर्व महाविद्यालये | २८/०९/२०२४ | उपकेंद्र परभणी |
| ४ | हिंगोली | सर्व महाविद्यालये | २८/०९/२०२४ | न्यु.मॉडेल कॉलेज हिंगोली |

## <u>प्रवेशीत विद्यार्थ्याची पात्रता घेण्यासाठी महाविद्यालयास विशेष सुचना व नियम</u>

१) प्रस्तूत विद्यापीठातील पदव्युत्तर प्रथम वर्षात अनुतीर्ण होऊन त्याच वर्गात पुर्नरप्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे ही पात्रता आवेदनपत्र ऑनलाईन सादर करावे. पदव्युत्तर द्वितीय वर्षातील अनुतीर्ण होणा—या विद्यार्थ्यांना पुर्नरप्रवेश देण्यात येऊ नयेत.

२) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश देते वेळी विद्यार्थ्यांना १०+२+३ या शैक्षणिक आकृती बंधाप्रमाणे UGC व शासनमान्य विद्यापीठातुन अभ्यासक्रम पुर्ण केलेला असणे आवश्यक आहे. तसेच M.A. व M.Sc. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश देताना त्या — त्या विषयातील २४क्रेडीट पूर्ण करणे अनिवार्य आहे त्या शिवाय प्रवेश देण्यात येऊ नये.

३) शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्राची (T.C.) मुळप्रत हरवल्यास, त्याची पूर्ण खात्री करून, त्याबाबतीत टी.सी.ची द्वितीय —प्रत घेऊन प्रवेश देण्यात यावा. मात्र अशा प्रवेशाच्या संदर्भात कालांतराने चुकीची माहीती निर्दशनास आल्यास असे प्रवेश रद्द करण्यात येतील व त्यामुळे होणाऱ्या सर्व परिणामाची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील.

४) काश्मीरी निर्वासित व्यक्तीच्या पाल्याच्या प्रवेशासाठी या विद्यापीठाचे परीपत्रक. Acad/Elig/Admn/२००४. ०५/३८९०.४०८९ दिनांक २३/३/२००५ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

**६) महाविद्यालयाने सादर केलेली पात्रता यादी हिवाळी २०२४ या परीक्षेच्या प्रवेश पत्र (Admit Card) तयार करणेसाठी वापरण्यात येणार असल्याने, प्रवेशीत विद्यार्थ्यांची पात्रता यादी तयार करतांना ज्या गुणपत्रका— आधारे प्रवेश देण्यात येणार आहे, त्या गुणपत्रकावरचे नाव अचूक टाईप करुन त्याने निवडलेल्या विषयासह यादी सादर करावी, झालेल्या चूकीमुळे विद्यार्थ्यांचा निकाल EC मध्ये राहिल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहील.**

५) ज्या विषयास मान्यता/ संलग्निकरण आहे, त्याच विषय/विषय ग्रुप साठी प्रवेश देणे बंधनकारक आहे. दुस—या विषयाचे नाव/ग्रुप निवडुन परीक्षा दिल्यास त्यांची घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात येईल.

७) पात्रता यादया ०३ प्रती मध्ये सादर कराव्यात.

८) शैक्षणिक वर्ष २०२४— २५ साठी संलग्निकरण पत्र तसेच क्रीडा, विद्यार्थी कल्याण, राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) या विभागाचे NO DUES पात्रता यादीसोबत सादर करावे.

९) महाविद्यालयांनी संबंधीत अभ्यासक्रमाच्या पात्रतेचे निकष पाहुनच विद्यार्थ्यानां प्रवेश दयावेत. निकष/नियमबाहय प्रवेश दिल्यास, त्यामुळे होणाऱ्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक नुकसानिसाठी व त्याअनुषंगाने काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

१०) शैक्षणिक वर्ष २०२४— २५ मध्ये नव्याने सुरू झालेल्या व पूर्वीच्या जून्या मान्यता असलेल्या महाविद्यालयाने पात्रता आवेदन पत्रासोबत विद्यापीठ संलग्निकरणाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

११) महाविद्यालयास पात्रता शुल्काचा धनाकर्ष/लेखा विभागाची पावती, पात्रता आवेदनपत्र दाखल करण्यास विलंब झाल्यास विहीत तारखेनंतर प्रति दिवस रू. १००/—विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१२) प्रस्तुत विद्यापीठाचे पदवीधारक विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेत असतील, तरीही पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पात्रता आवेदनपत्र व पात्रता शुल्क सादर करणे बंधनकारक आहे.

१३) पात्रता आवेदन पत्रासोबत खालील कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. कांही कागदपत्राच्या त्रुटी पूर्तते अभावी एखादया विद्यार्थ्याची पात्रता राखीव ठेवलेली असेल तर अशा विद्यार्थ्यास सदर त्रुटीची पूर्तता केल्याशिवाय पात्रता प्रदान केली जाणार नाही, संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर केला जाणार नाही सदर त्रुटीची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची/महाविद्यालयाची राहील.

| अक्र | पदव्यूत्तर अभ्यासक्रमासाठी | प्रकार |
|---|---|---|
| अ | पदवीचे गुणपत्रक (Statement of Marks) अथवा समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक | मुळप्रत व छायाप्रत |
| ब | पूर्वी शिकत असलेल्या शाळा/महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्राची (T.C.) | मुळप्रत व छायाप्रत |
| क | स्थलांतर प्रमाणपत्र Migration Certificate (स्वा.रा.ती.म.विद्यापीठाबाहेरील विद्यार्थ्यासाठी) | मुळप्रत |
| ड | खंड प्रमाणपत्र बाबत हमीपत्र आवश्यक आहे (Gap Certificate) (शिक्षणात खंड पडलेला असल्यास) | साक्षांकित छायाप्रत |
| इ | जातीचे प्रमाण पत्र (Caste Certificate)मागासवर्गीयांसाठी व आवश्यक तेथे जात वैधता प्रमाणपत्र Caste Validity Certificate,NCL, व्यावसायीक अभ्यासक्रमांसाठी | साक्षांकित छायाप्रत |

**:पात्रता आवेदन पत्रासोबतची जोडपत्रे:**

१४) अ. क्र. १३ मध्ये नमुद केलेल्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता दिनांक **३१.१२.२०२४** पर्यंत करणे आवश्यक आहे. कागद पत्राची पूर्तता न केल्यास अशा विद्यार्थ्याचा निकाल पात्रते अभावी राखीव ठेवण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची/महाविद्यालयाची राहील. तसेच उपरोक्त दिनांका पर्यंत त्रुटीतील कागदपत्रांची पूर्तता न केल्यास प्रति विद्यार्थी रू. ५००/— विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१५) प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांनी पात्रता आवेदनपत्रावर स्वाक्षरी केलेली आहे, अशा प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांच्या नियुक्तीस विद्यापीठ मान्यता असलेल्या पत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६) अतिरीक्त तुकडी असल्यास, विद्यापीठ संलग्नीकरण व शासनमान्यतेचे पत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१७) ज्या महाविद्यालयांना प्रवेश क्षमते पेक्षा जास्त प्रवेश देण्यास विद्यापीठाने मान्यता दिलेली आहे, अशा मान्यता पत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे, त्या प्रवेश क्षमते पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पात्रता मान्य करता येणार नाही.

१८) शैक्षणिक वर्ष २०२४— २५ मध्ये महाविद्यालयातील सर्व पद्व्युत्तर अभ्यासक्रमांच्या एकुण प्रवेशित विद्यार्थ्यांची (प्रथम,द्वितीय व तृतीय वर्षातील) माहिती पात्रता आवेदनपत्रा सोबत सादर करणे आवश्यक आहे. अशी माहिती सादर करताना महाविद्यालयात शिकविल्या जाणा—या प्रत्येक अभ्याक्रमासाठी (उदा.एम.ए.,एम.एस्सी., एम.कॉम, व इतर अभ्यासक्रम इत्यादी) स्वतंत्र पान वापरावे. ही माहिती ०६ प्रतीत आणावी. त्यापैकी एक प्रत सांख्यिकी विभाग, विशेष कक्ष, क्रीडा विभाग, विद्यार्थी कल्याण, राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) व पात्रता विभाग येथे सादर करावी व त्याची पोच प्रत पात्रता विभागात सादर करावी.

१९)विद्यार्थ्यांची पात्रता विद्यापीठाने मान्य केलेली नसेल किंवा एखादा विद्यार्थी पात्रता आवेदन पत्र/शुल्क सादर न करता परीक्षेस बसला असल्याचे निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्याचे प्रवेश/परीक्षा त्वरीत रद्द करण्यात येईल.

२०) **कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थांना किंवा त्यांच्या पालकांना त्रुटीची पूर्तता किंवा त्या संबंधीत कामासाठी विद्यापीठात पाठविण्यात येऊ नये अशा सर्व त्रुटी महाविद्यालयीनस्तरावर संकलीत करून त्रुटीची पूर्तता करण्यास्तव महाविद्यालयीन कर्मचा—यास पाठविण्यात यावे.**

२१) व्यावसायीक अभ्यासक्रमांसंदर्भात केंद्रीय पध्दतीने होणाऱ्या प्रवेशाबाबत प्रवेश नियंत्रण समिती व बार कौन्सील ऑफ इंडीया, ए.आय.सी.टी.ई., डी.टी.ई. एन.सी.टी.ई, पी.सी.आय. इत्यादी प्राधीकरणांतर्गत होणाऱ्या प्रवेशा बाबत शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक आहे.

२२) व्यावसायिक अभ्यासक्रमातील द्वितीय वर्षातील प्रवेशीत विद्यार्थ्याचे MSBTE चे (**MIGRATION**) सादर करणे आवश्यक आहे.

२३) व्यावसायीक अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्याचे प्रवेश हे केंद्रीय पध्दतीने होत असल्यामुळे प्रवेश नियंत्रण समिती, **(ARA)** मुंबई यांची अंतिम प्रवेश मान्यता आल्यानंतरच पात्रतेची पुढील कार्यवाही केली जाईल. तसेच विद्यार्थ्याचे प्रवेश प्रक्रियेतील त्रुटींची पूर्तता प्रवेश नियंत्रण समिती मुंबई यांचे कडे करून अंतिम मान्यता यादी विद्यापीठास सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये यांची राहील. त्या शिवाय अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारले जाणार नाहीत. तसेच अशा विद्यार्थ्याचा निकाल राखीव ठेवण्यात येईल आणि पात्रता प्रदान करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

२४) **प्रवेश पात्रते संदर्भात कोणत्याही विद्यार्थ्यास विद्यापीठात पाठवु नये.**

२५) पात्रता  यादी तयार करतांना ज्या गुणपत्रका आधारे प्रवेश देण्यात येणार आहे त्या मुळ गुणपत्रकावरचे जे नाव आहे तेच नाव पात्रता आवेदन पत्रात लिहावे, यादीमध्ये नावात चूक झाल्यास, त्यास महाविद्यालय जबाबदार राहील.

२६) विद्यार्थ्यांनी पात्रता आवेदन पत्रात नमुद केलेले विषयच परीक्षा आवेदन पत्रावर नमुद करावे कोणत्याही परीस्थितीत विषय बदलता येणार नाही.

२७) विद्यार्थ्याच्या आवेदन पत्रात भ्रमणध्वणी क्रमांक व ई—मेल अचुक नमुद करावे.

टिप :— ०१. पात्रता अवेदनपत्र व कागदपत्र तपासणीसाठी कॅम्प आयोजित करण्यात येणार आहे, त्याचे स्वतंत्र वेळापत्रक देण्यात येईल त्याप्रमाणे संबंधीत महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित असणे अवश्यक आहे.

०२. या लिंक अथवा QR Code  चा वापर करून सुद्धा पात्रता आवेदन पत्र सादर करता येते.

**https://srtmuadm.dulive.ac/applicant/#/login?client=SRTMU**

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत:  १)मा.कुलसचिव,प्रस्तुत विद्यापीठ

२)मा.वित्त व लेखाधिकारी,प्रस्तुत विद्यापीठ.

३)मा.संचालक उपकेंद्र,लातूर.

४)मा.संचालक उपपरिसर,परभणी.

५)मा.समन्वयक, कै.उत्तमराव राठोड अदिवासी संशोधन केंद्र, किनवट.

६)मा. प्राचार्य, न्यु मॅडेल डिग्री कॉलेज हिंगोली.

७)सांखिक,सांखिकी विभाग,प्रस्तुत विद्यापीठ यांना सुचित करण्यांत येते की महाविद्यालयांची प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संकलीत करून संग्रही ठेवावी.